आजचा शुभ विचार

स्वप्ने पाहणाऱ्यांना अडथळे आव्हानांचे संकेत म्हणून दिसतात, निराशेचे नाही. स्वप्नांच्या पीछ्याने जाताना, तुमच्या मनाची शक्ती वाढते.

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-64 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Friday 11 July 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ६४ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शुक्रवार, दि. ११ जुलै २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

## जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मंजूर

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------



बहुचर्चित 'राज्य जनसुरक्षा विधेयक' अखेर आज विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आलं आहे. शहरी नक्षलवाद आणि लोकशाहीविरोधी संघटनांचा बिमोड करण्यासाठी हे महत्त्वाचं विधेयक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात मांडलं होतं. तब्बल १२,५०० सूचनांचा अभ्यास करून तयार झालेलं हे विधेयक, डहाणूचे आमदार विनोद निकाले यांच्या एकमेव विरोधानंतर बहुमताने मंजूर झाल्याची घोषणा करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (आज) विधानसभेत हे विधेयक सादर करताना सांगितलं की, शहरी नक्षलवादाला आळा घालण्यासाठी सरकारनं हे विधेयक आणलं आहे. यापूर्वी डिसेंबर २०२४ मध्येही हे विधेयक मांडण्यात आलं होतं, पण तेव्हा ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवण्यात आलं होतं.

संयुक्त समितीने यात अनेक महत्त्वाचे बदल सुचवले होते, त्यातील बहुतांश बदल सरकारने स्वीकारले आणि विधेयकाची सुधारित आवृत्ती आज मांडण्यात आली. कायदा आणि सुव्यवस्थेत व्यत्यय आणणा-या कारवायांना आळा घालण्यासाठी आणि तसं करणा-यांसाठी विशिष्ट कायदा असावा, यासाठी हे विधेयक आणल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

या नव्या कायद्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणा-या संघटनांवर कडक कारवाई करण्यासाठी सरकारला अधिक अधिकार मिळणार आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केलं की, हा कायदा डाव्या विचारांच्या विरोधात नसून, हिंसेचं समर्थन करणा-या कट्टर विचारसरणीच्या विरोधात आहे.

१२,५०० सूचना आणि हरकतींचा अभ्यास करून मूळ विधेयकात तीन महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील २५ सदस्यीय सर्वपक्षीय संयुक्त समितीने यावर काम केलं होतं, ज्यात जितेंद्र आव्हाड, सतेज पाटील, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, शशिकांत शिंदे, अजय चौधरी यांचा समावेश होता.

**ताब्यात घेण्याचे अधिकार:** सरकारच्या मते, 'सार्वजनिक सुव्यवस्थेस किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका' ठरणा-या कोणत्याही कडव्या विचारांच्या संघटनेच्या व्यक्तीला कोणतेही आरोप न नोंदवता तात्काळ ताब्यात घेण्याची तरतूद.

**संघटना बेकायदेशीर:** एखाद्या संघटनेला बेकायदेशीर जाहीर करता येणार.

**संपत्ती जप्ती:** बेकायदेशीर घोषित केलेल्या संघटनेचे कार्यालय, परिसर, इतर संपत्ती जप्त करता येणार.

**खाती गोठवणे:** बेकायदेशीर जाहीर झालेल्या संघटनांची बँकांमधील खाती गोठवता येतील.

**नवीन संघटनाही बेकायदेशीर:** बंदी घातलेल्या संघटनेचे पदाधिकारी/कार्यकर्ते नव्या नावाने संघटना उभारून तेच कार्य करत असतील, तर ती नवी संघटनाही मूळ बेकायदेशीर संघटनेचा भाग मानली जाईल आणि ती बेकायदेशीर ठरेल.

**गुन्हे दाखल करण्यासाठी परवानगी:** डीआयजी रँकच्या अधिका-याच्या परवानगीनेच गुन्हे दाखल करता येतील.

महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे
राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार
कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!

महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
SWARAJYADOOT LIVE
दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449

## मुंबई शहर व लगत जमीन उपलब्धतेनुसार मुंबईमधील पात्र गिरणी कामगारांना घरे देणार

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



मुंबईतील गिरणी कामगारांना त्यांच्या हक्काचे घर मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. कुठल्याही पात्र गिरणी कामगाराला घरापासून वंचित ठेवले जाणार नाही, याची काळजी शासन घेत आहे. मुंबई शहर व लगतच्या परिसरात जिथे जागा उपलब्ध असेल, अशा ठिकाणी गिरणी कामगारांना घरे बांधून देण्यात येईल असा निर्णय आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या बैठकीत झाल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

मंत्री सामंत म्हणाले, आझाद मैदानावर गिरणी कामगारांच्या आंदोलनाला भेट दिल्यानंतर दिलेल्या आश्वासनानुसार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज गिरणी कामगारांच्या संघटनांच्या प्रतिनिधींसोबत विधीमंडळात बैठक झाली. या बैठकीत कामगारांना घरे देण्याबाबत विविध निर्णय घेण्यात आले.

शेलू येथील घरे घेण्याबाबत गिरणी कामगारांना कुठलीही सक्ती करण्यात आली नाही. असा कुठलाही निर्णय झाला नसताना अपप्रचार करण्यात आल्याचे मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितले. शेलू येथील घरे गिरणी कामगारांना घेणे सक्तीचे नसून ऐच्छिक आहे. तसेच २०२४ मध्ये घर न घेतलेल्या गिरणी कामगारांचा घराचा दावा संपुष्टात येईल, असे होणार नसून यासंदर्भातील शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक १७ रद्द करण्याचा निर्णय देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

गिरणी कामगारांना झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात घरे मिळवून देण्याबाबत कोटा निर्माण करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे मुंबई शहरातील मिठागरांच्या जागांवर गिरणी कामगारांच्या घरांसाठी मिळण्याबाबत केंद्राला विनंती करण्यात येत असून गिरणी कामगारांना न्याय देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. आज झालेल्या या बैठकीत गिरणी कामगारांच्या हितासाठी निर्णय घेतल्याचे सामंत यांनी सांगितले.

## हमीभावाने सोयाबीन खरेदीत गैरव्यवहार; पणन मंत्र्यांच्या कारवाईची अधिकाऱ्यांमध्ये धास्ती

**राजेश यादव**
**सातारा प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

-----------------------------



भोकरदन येथील वीर छत्रपती सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेच्या सोयाबीन खरेदीत गैरव्यवहार झाल्याचे प्रथमदर्शिनी समोर आले आहे. या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणी जिल्हा पणन अधिकाऱ्याला तत्काळ पदमुक्त करण्यात येईल, अशी घोषणा पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधान परिषदेत केली. विक्रम काळे यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत हस्तक्षेप करीत उपसभापती निलम गोऱ्हे यांनी जिल्हा पणन अधिकाऱ्याला तत्काळ पदमुक्त करण्याची सूचना केली. ही सूचना मान्य करून रावल यांनी संबंधित अधिकाऱ्याला तत्काळ पदमुक्त करीत असल्याचे जाहीर केले.

देशाच्या ७५ वर्षांच्या इतिहासात महाराष्ट्रात यंदा विक्रमी ११.२१ लाख टन खरेदी झाली आहे. सोयाबीन उत्पादक ५.११ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर खरेदी पोटी ५,५०० कोटी रुपये वर्ग करण्यात आले आहेत. ही सर्व खरेदी प्रक्रिया पारदर्शी झाली आहे. भोकरदन येथील वीर छत्रपती सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्थेच्या सोयाबीन खरेदीत गैरव्यवहार झाल्याचे समोर आले आहे. संस्थेने २,५१९ शेतकऱ्यांकडून ३९ हजार क्विंटल सोयाबीन खरेदी केली असून, १९ कोटी रुपये संबंधितांच्या खात्यावर वर्ग केले आहेत. चौकशीत १९ शेतकऱ्यांच्या सात-बारावर सोयाबीन नव्हते, तरीही त्यांच्याकडून सोयाबीन खरेदी करण्यात आले. या शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यात आले. या प्रकरणी भागवत सुदाम दौंड यांच्यासह नऊ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. जिल्हा पणन अधिकाऱ्याला तत्काळ पदमुक्त करण्यात येईल, असेही रावल म्हणाले.

## गुरूपौर्णिमेच्या दिवशी घडली दुर्देवी घटना, भाविकांच्या वाहनाचा अपघात, चौघांचा मृत्यू

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------




गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने इगतपुरी तालुक्यात दर्शनाला आलेल्या भाविकांच्या वाहनाचा भीषण अपघात झाला आहे. नाशिक मुंबई महामार्गावरील मुंढेगाव फाट्यावर झालेल्या ह्या भीषण अपघातात २ महिला आणि २ पुरुष असे ४ जण जागीच ठार झाले आहे.

भाविकांच्या इको वाहनाला सिमेंट पावडर घेऊन जाणाऱ्या कंटेनरने पुढे फरफटत नेल्याने हा अपघात झाला. इको वाहनातील चार जणांचा दाबल्याने जागीच दुर्देवी मृत्यू झाला. अपघातग्रस्त सर्व रहिवासी अंधेरी मुंबई येथील असल्याचे समजते.

क्रेनच्या सहाय्याने गाडीखाली दबलेले मृतदेह बाहेर काढण्यास सुरुवात करण्यात आली आहे. महामार्गावर काही प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे. जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान नानिज धाम मोफत रुग्णवाहिकेचे रुग्णमित्र निवृत्ती पाटील गुंड यांनी समयसुचकतेने अपघातस्थळी दाखल होऊन मदत कार्य केले. घोटी पोलीस, महामार्ग पोलीस, टोल नाक्याची टीम घटना स्थळी दाखल झाली आहे. अपघातग्रस्त भाविक मुंढेगावजवळ रामदास बाबा यांच्या मठात गुरुपौर्णिमेसाठी आले होते.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर, जाहिरात प्रतिनिधी, गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

# डिजिटल क्रांती नव्हे ही लोकचळवळ..

गेल्या १० वर्षांत भारतामध्ये डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून प्रशासन, सार्वजनिक सेवेसह अनेक क्षेत्रांत ऐतिहासिक बदल झालेले आपल्याला पाहायला मिळत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात डिजिटल इंडिया ही केवळ एक संकल्पना राहिली नाही, तर परिवर्तनाचा दूत ठरली आहे. तंत्रज्ञानातील या नव्या बदलामुळे ग्रामीण भागातही अनेक जणांच्या हाती काही ना काही नव्या वस्तू लागल्याचे दिसत आहे. भारतात डिजिटल क्रांती होईल का? असा प्रश्न सातत्याने विचारला जात होता.

चलनातील नाणे, रोख रक्कम नसतील तर व्यवहार कसे होणार याबाबत १० वर्षांपूर्वी कोणाला प्रश्न विचारला असता, ते उत्तर नकारात्मक आले असते. त्याचे कारण मोठ्या संख्येने असलेल्या अर्धशिक्षित लोकांना हा डिजिटल व्यवहार जमणार कसा अशी सार्वत्रिक भावना होती. आज आपण बाजारात गेलो तर भाजीवाल्यांपासून चहाच्या टपरीवर गुगल पे, फोन पेने पैसे देतो. दुकानात स्कॅनर ठेवलेला असतो, त्यामुळे १० रुपयांचा कटिंग चहा प्यायल्यानंतरही खिशातील सुट्टे पैसे काढण्याची गरज उरत नाही.

यूपीआयद्वारे चहावाल्यालाही पैसे पोहोचतात, ही साधी गोष्ट सर्वसामान्य नागरिकांच्या अंगवळणी पडली आहे. त्यामुळे मोबाईल, इंटरनेट कनेक्शन या गोष्टी तो घरातून बाहेर पडताना ध्यानात ठेवताना दिसतो. खऱ्या अर्थाने डिजिटल व्यवहाराचा चेहरा बदलण्यात युनिफाईड पेमेंट्स इंटरफेसचा (यूपीआय) मोठा वाटा आहे. दैनंदिन व्यवहाराचे यूपीआय हे प्रमुख माध्यम बनले आहे. मार्च २०२५ मध्ये केवळ एका महिन्यात यूपीआयच्या माध्यमातून २५ लाख कोटी रुपयांचे १८ हजार दशलक्ष व्यवहार झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. आज भारतात ४६० दशलक्षहून अधिक नागरिक आणि ६५ दशलक्षहून अधिक व्यापारी यूपीआयचा वापर करत आहेत.

प्रत्येक भारतीयांसाठी पुरावा म्हणून ओळख असलेल्या आधार कार्डची डिजिटल ओळखसुद्धा अधिक विश्वासार्ह ठरली आहे. बँकांमधील ई-केवायसी सेवा सुटसुटीत झाली आहे.

भारतात १९९० च्या दशकाच्या अखेरीस प्रथमच मोबाइल फोन आले, तेव्हा ते फक्त श्रीमंतांसाठीचे यंत्र आहे अशी त्याची प्रतिमा तयार झाली होती. मात्र, पुढील काही दिवसांत भारत नावाच्या मोठ्या बाजारपेठेने मोबाइल यंत्रांची किंमत तर खाली आणली, पण ही बाजारपेठ काबीज करण्याच्या स्पर्धेने ही सेवा सर्वसामान्य भारतीयांना परवडेल इतकी खाली आणून ठेवण्याचा सरकारकडून प्रयत्न झाला. आता तर ग्राहक मिळविण्यासाठी ती सेवा मोफत दिली जात आहे आणि ती मोबाईल सेवा घेण्यासाठी भारतीय ग्राहकांच्या उड्या पडत आहेत. जगातील खरे बदल हे तंत्रज्ञानाने घडवून आणले आहेत, असे म्हणतात, ते खरे आहे, याची प्रचिती मोबाइल फोनच्या क्रांतीमुळे दिसून आली आहे.

देश स्वातंत्र्य झाल्यापासून भारतात रोखीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत होते. त्यासाठी रिझर्व्ह बँकेला प्रचंड खर्च सहन करावा लागत होता. रोख वितरित करणे, ती सांभाळणे, ती सतत बदलत राहणे, खराब नोटांची विल्हेवाट लावणे हा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कामाच्या दृष्टीने मोठा उपद्व्याप होता आणि आजही तो आहे. रोखीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये काळ्या पैशाने धुमाकूळ घातला होता, हे अनेक आर्थिक घोटाळ्यांच्या प्रकरणानंतर उघडकीस आले होते. त्यामुळे डिजिटल पेंमेटमुळे घोटाळ्यांना आळा बसण्यास सुरुवात झाली. तसेच डिजिटल व्यवहार वाढल्याने वाचणारी रक्कम रिझर्व्ह बँकेकडून केंद्र सरकारला दरवर्षी लाभांश रूपात दिली जाते, हा अप्रत्यक्ष फायदा आता दिसू लागला आहे.

डिजिटल व्यवहारांमुळे पारदर्शी व्यवहार वाढीला प्रोत्साहन मिळाले आहे. डिजिटल माध्यमातून होणाऱ्या व्यवहारातून सरकार जी सबसिडी देते, ती थेट लाभार्थींच्या बँक खात्यात जमा होत आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपयांची बचत होत असते. काळे व्यवहार करण्याला प्रोत्साहन देणाऱ्या ५०० रुपयांच्या नोटा जोपर्यंत व्यवहारात आहेत तोपर्यंत डिजिटल व्यवहारांना अपेक्षित गती मिळणार नाही, हे ओळखून आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या नोटा व्यवहारातून काढून टाकण्याची मागणी सातत्याने केली आहे. केंद्र सरकारने या मागणीकडे गांभीर्याने पाहिले तर पुढील काळात लवकरच भारतातही डिजिटल युगाचा अविष्कार पाहण्यास मिळेल, अशी आशा करायला हरकत नाही.

केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया' या कार्यक्रमाला दहा वर्षे पूर्ण झाली आहे. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल क्रांती ही केवळ एक प्रशासन योजना राहिली नाही, तर ती "लोकांची चळवळ" बनली आहे, असे मत मांडले. २०१४ मध्ये भारतात सुमारे २५ कोटी इंटरनेट कनेक्शन होते, जे आज ९७ कोटींहून अधिक झाले आहे. दहा वर्षांपूर्वी इंटरनेटचा वापर मर्यादित होता, डिजिटल साक्षरता कमी होती आणि सरकारी सेवांमध्ये ऑनलाइन प्रवेश दुर्मीळ होता. भारतासारखा विशाल आणि भाषा, प्रांत रचनेमुळे विविधतेने नटलेल्या देशात खरोखर डिजिटल होऊ शकेल का याबद्दल अनेकांच्या मनात शंका होती. आज, या प्रश्नाचे उत्तर केवळ डेटा आणि डॅशबोर्डमध्येच नाही तर १४० कोटी भारतीयांच्या जीवनात प्रत्यक्षात उतरलेले पाहायला मिळत आहे.

बनारसी विणकरांपासून ते नागालँडमधील बांबू कारागिरांपर्यंत, विक्रेते आता मध्यस्थाशिवाय डिजिटल व्यासपीठामुळे देशभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहेत. मोदी यांच्या नेतृत्वामुळे गेल्या १० वर्षांत डिजिटल क्रांतीला जो वेग मिळाला, त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. गेल्या ११ वर्षांत भारताने डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून प्रशासन, सार्वजनिक सेवा आणि अनेक क्षेत्रात ऐतिहासिक बदल पाहिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात डिजिटल इंडिया ही केवळ एक संकल्पना ठरली नाही तर परिवर्तनाचा दूत ठरली आहे. तंत्रज्ञानातील नवीन झेप ग्रामीण भागात बदलाचा पाचा रोवणारी ठरली. या नव्या बदलामुळे ग्रामीण भागातही अनेक जणांना काही ना काही हाती लागले. त्यांना काहीतरी गवसले.

## "एक झाड आईच्या नावे" उपक्रमात गोरेगाव केंद्र शाळेचा उत्साहाने सहभाग
### पर्यावरण रक्षणाचा नवा संकल्प — ५० हून अधिक वृक्षांची लागवड

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------------

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी महाराष्ट्रात व्यापक पातळीवर राबविण्यात येणाऱ्या "एक झाड आईच्या नावे" या राज्यव्यापी उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा, गोरेगाव येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात सुमारे ५० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली.





कार्यक्रमावेळी मुख्याध्यापिका सौ. एल. एन. हरीणखेडे मॅडम यांनी पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "जागोजागी वाढणारे प्रदूषण आणि त्यामुळे होणारे आजार यावर नियंत्रण ठेवायचे असल्यास प्रत्येकाने एक तरी झाड लावणे आणि त्याचे संगोपन करणे अत्यावश्यक आहे. आज आपण ऑक्सिजनसाठी रुग्णालयांमध्ये सिलेंडरवर अवलंबून आहोत. मात्र झाडे लावल्यास नैसर्गिकरीत्या ऑक्सिजन मिळू शकतो."

तसेच त्यांनी सांगितले की, "जसे विद्यार्थी शाळेत प्रथम ते दहावीपर्यंत शिक्षण घेतात, त्याचप्रमाणे लावलेल्या झाडांचे पालन-पोषण करणे हे आपले कर्तव्य आहे. वृक्ष असतील तर पावसाचे प्रमाण वाढेल, शेती फळेल आणि संपूर्ण परिसंस्था टिकेल."

कार्यक्रमाला उपस्थित राहिलेले मान्यवर:सौ. सारिका चंदेल मॅडम – विषयतज्ञ, एस. एम. कोल्हारे सर – सहाय्यक शिक्षक व माजी सैनिक, पो. पा. सौ. शारदाताई सहारे – पोषण आहार विभाग , फुलवंताबाई सोनवणे – शालेय पोषण आहार मदतनीस, शिशुकलाबाई मोहनकर

या उपक्रमाच्या यशस्वीतेमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयीची जाणीव वाढली असून, "एक झाड आईच्या नावे" या उपक्रमात त्यांचा सहभाग हे सामाजिक बांधिलकीचे उदाहरण आहे.

# उघड्यावरील मांस विक्री दुकांनावर सटाणा नगर परिषदची कारवाई

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------------

कोणतीही व्यक्ती बेकायदेशीररित्या नगरपालिका क्षेत्रात मांस विकण्यासाठी किंवा पुरविण्यासाठी कोणत्याही जनावराची कत्तल करत असेल तर ते कृत्य कायद्याचे उल्लंघन म्हणून कठोर कारवाईची स्पष्ट तरतूद महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये नमूद असताना; सटाणा नगर परिषद कार्यक्षेत्र हद्दीत नाशिक नाका- मंगलनगर ते जुने अमरधाम रोड तसेच दोधेश्वर नाका- ताहाराबाद रोड नवीन-अमरधाम रोड व अन्य परिसरात सर्रासपणे बेकायदेशीररीत्या कत्तलखाने व उघड्यावरील पशू-पक्ष्यांची मांस विक्री केली जात आहे. सदर बेकायदेशीररित्या चालविण्यात येणारे कत्तलखाने तथा उघड्यावरील मांस विक्री दुकानांमुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले असून, घातक रोगराईला निमंत्रण मिळत आहे. नागरिकांच्या आरोग्यास तसेच जीवितास बाधा आणू शकणाऱ्या अशा


सटाणा नगरपरिषद, सटाणा
जि. नासिक, महाराष्ट्र
दूरध्वनी: 02555-223006, 223018, 223084
अग्निशमन सेवा 02555-101, टोल फ्री 1800 233 3008
ई-मेल baglanup@yahoo.com संकेतस्थळ satanamahaulb.maharashtra.gov.in

जा.क्र.बांध/६४१/२०२५ दि. ०३ /०७/२०२५

प्रति,
मा.सहआयुक्त सो,
नगरपालिका शाखा
जिल्हाधिकारी कार्यालय,
नाशिक जि.नाशिक

विषय- दि.१३/०६/२०२५ रोजी श्री.अमोल बाळासाहेब बच्छाव यांची तक्रार व आपले सरकार पोर्टल वरील दि.१८/०६/२०२५ रोजीची तक्रार.

संदर्भ - १) श्री.अमोल बाळासाहेब बच्छाव यांचा दि.१३/०६/२०२५ रोजीचा तक्रार अर्ज
२) आपले सरकार पोर्टल वरील दि.१८/०६/२०२५ रोजीची तक्रार.

महोदय,
वरील विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, दि.१३/०६/२०२५ च्या तक्रारी नुसार व आपले सरकार पोर्टलवरील दि.१८/०६/२०२५ रोजीची तक्रारी नुसार सर्व संबंधितांना दि.२०/०६/२०२५ रोजी सुचना देवुन कार्यवाही करण्यात आलेली असुन त्यांचे तात्पुरते दुकाने तेथुन उचलुन घेण्यात आलेली आहेत.
सदर मोहीम स्वच्छता व वसुली विभागाने संयुक्तरित्या राबविली आहे. तसेच दि. ०२/०७/२०२५ रोजी नगरपरिषद अधिनियमातील तरतुदीनुसार सर्व संबंधितांना नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. तसेच भविष्यात सटाणा नगरपरिषद क्षेत्रात उघड्यावर मांस विक्री बाबत नगरपरिषद सटाणा वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही करेल.
तरी सदर तक्रारी निकाली काढण्यात यावी ही नम्र विनंती.

(ज्योती भगत)
मुख्याधिकारी,
सटाणा नगरपरिषद,सटाणा.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -
१) श्री.अमोल बाळासाहेब बच्छाव
रा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर,सटाणा
ता.बागलाण जि.नाशिक

बेकायदेशीररित्या चालविण्यात येणारे कत्तलखाने तथा उघड्यावरील मांस विक्री दुकानांकडे नगर परिषद प्रशासनाचे कमालीचे दुर्लक्ष असून प्रशासनाच्या कर्तव्यात कसूर आणि बेजबाबदारपणामुळे नागरिकांचे आरोग्य आणि सार्वजनिक स्वच्छता धोक्यात आली आहे. तरी, याकडे सार्वजनिक हिताचा विषय म्हणून गांभीर्याने लक्ष देत सदर बेकायदेशीररित्या चालविण्यात येणारे कत्तलखाने तथा उघड्यावरील मांस विक्री दुकाने तात्काळ बंद करावीत, कायद्यातील तरतूदिंना पायदळी तुडविणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. याविषयीची तक्रार संविधान अभ्यासक प्रा. अमोल बाळासाहेब बच्छाव यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली होती. याची दखल घेत नगर परिषदेने उघड्यावरील मांस विक्री करणाऱ्या संबंधित बेकायदेशीर मांस विक्री दुकानदारांवर कारवाई केली आहे. पुन्हा जर सटाणा शहरात अशा पद्धतीने उघड्यावर मांस विक्री केली गेली तर कठोर पावले उचलली जातील असेही नगर परिषदेने जिल्हा प्रशासन आणि प्रा. अमोल बच्छाव यांना लेखी कळविले आहे. त्यामुळे बेकायदेशीररित्या उघड्यावर मांस विक्री करणाऱ्यांना चांगलाच चाप बसला आहे.

# जि.प. वरिष्ठ प्राथमिक शाळा निंबा चा कायापालट!
## उपक्रमशीलतेच्या जोरावर पटसंख्येत लक्षणीय वाढ; ८९ वरून ११५ पर्यंत झेप

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------------

देवरी तालुक्याच्या सीमेवर वसलेली गोरेगाव तालुक्यातील निंबा ग्रामपंचायत ही सर्वात शेवटची पंचायत असूनही येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा आपल्या प्रगतीने आज चर्चेत आली आहे. गावकरी, पालक, शालेय व्यवस्थापन समिती आणि ग्रामपंचायत यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शाळेचा चेहरामोहरा पूर्णतः बदलत आहे.

मागील शैक्षणिक सत्रात केवळ ८९ विद्यार्थी असलेल्या शाळेची पटसंख्या यंदा वाढून ११५ वर पोहोचली असून, कॉन्व्हेंट स्कूल सोडून परत आलेल्या २० विद्यार्थ्यांचा समावेश झाल्यामुळे एकूण विद्यार्थी संख्या १३५ पर्यंत पोहोचली आहे.



शाळेच्या शिक्षण सेवकांनी उन्हाळ्याच्या सुट्ट्यांतही शिष्यवृत्ती मार्गदर्शन, नवोदय प्रवेश तयारी, मोहल्ला अभ्यास उपक्रम, संध्याकाळी सहाध्यायी तास यांसारखे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले. याचं फलित म्हणून गुणवत्तेमुळे व आकर्षक शिक्षण पद्धतीमुळे शाळेकडे पालकांचा कल वाढलेला दिसतो.

गौरवाचे क्षण :
परसबाग स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक
अटल क्रीडा महोत्सवात जिल्हास्तरापर्यंत घवघवीत कामगिरी
स्पेशल इंग्रजी शिक्षण उपक्रम राबविण्यात आघाडी
शाळेला ग्रामपंचायतीचे भक्कम सहकार्य लाभत आहे. लोकवर्गणी, ग्रामसभा निधी, व शा. व्य. स. च्या सक्रियतेमुळे नवीन वर्ग सुरू करण्यात आले. यावर्षीपासून ८वीचा वर्ग आणि कॉन्व्हेंट स्वरूपातील शिक्षण देखील सुरू झाले आहे.

कार्यरत शिक्षक आणि मार्गदर्शक :
मुख्याध्यापक श्री मोहन बिसेन, शिक्षक विशाल वाघाडे, भारती वासनिक, ओमप्रकाश लिल्हारे यांनी एकत्रितपणे शिक्षण गुणवत्तेत सातत्य ठेवले आहे.

**मोहन बिसेन, मुख्याध्यापक :**
**"गावातील लोकप्रतिनिधी व पालकांच्या सहकार्याने हा बदल शक्य झाला. आमचं ध्येय म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास."**

वर्षाताई पटले, सरपंच ग्रामपंचायत निंबा :
"शाळेला ग्रामपंचायत मार्फत जेवढं सहकार्य करता येईल, ते आम्ही नक्की करू."

**मदनलाल कोटांगले, अध्यक्ष शा. व्य. स. निंबा :**
**"मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या ऊर्जावान कामामुळे शाळा भविष्यात नक्कीच मोठी होईल."**

# गुरुपौर्णिमेनिमित्त शाऴेत भावपूर्ण कार्यक्रम संपन्न

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------














अंबिका मित्र मंडळ संचलित डॉ. डी. एस. आहेर प्राथमिक विद्यालय दौलत नगर, सिडको येथे गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुवंदना कार्यक्रम अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात पवित्र ओंकार आणि मंत्रोच्चाराने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान करून गुरुप्रती श्रद्धा व्यक्त केली. पारंपरिक पोशाखात साक्षात "छोटे संत" भासणाऱ्या विद्यार्थ्यांनी शाळेचे संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि स्नेहपूर्ण केले. विद्यार्थ्यांनी "गुरु म्हणजे मार्गदर्शक, जीवनाचा दीपस्तंभ" या विषयांवर सुंदर भाषणं सादर केली. तसेच श्लोक पठण, स्तुतीगीतं, गायन व नृत्य सादर करून गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. बाळासाहेब पाटील, संस्थेचे सचिव श्री. अमोल बाळासाहेब पाटील, तसेच मुख्याध्यापिका सौ. विद्या पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात शाळेतील शिक्षकवृंद सौ. वैशाली भामरे, श्री. संदीप अहिरे, सौ. सविता वाघ, सौ. वर्षा बोटे, श्री. पंकज सोनवणे, सौ. पुनम पाटील, श्री. अन्वरशाह फकीर, सौ. भाग्यश्री पाटील, सौ. अश्विनी गायकवाड, श्री. संदीप दांडगे, सौ. माधवी पाटील, सौ. धनश्री विसपुते, आणि सौ. वृषाली महाजन हे उपस्थित होते व कार्यक्रमात सक्रिय सहभागी झाले.

मुख्याध्यापिका सौ. विद्या पाटील यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना गुरुंच्या भूमिकेचे महत्त्व व शाळेतील संस्कारक्षम शिक्षणाचे मूल्य समजावून सांगितले. संस्थापक अध्यक्ष श्री. बाळासाहेब पाटील यांनी शिक्षकवृंदाच्या कार्याची प्रशंसा करत गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने ज्ञानसंस्कृती जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. संस्थेचे सचिव श्री. अमोल पाटील यांनी गुरु-शिष्य परंपरेची आधुनिक काळातील गरज आणि शाळेतील एकात्मतेचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सुंदर आणि प्रभावी नियोजन शाळेतील सर्व शिक्षकांनी केले. विद्यार्थ्यांचा सहभाग व पालकांचा प्रतिसाद यामुळे कार्यक्रम अविस्मरणीय ठरला.

# माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत या विद्यालयाचा एन सी सी कॅम्प यशस्वी रित्या संपन्न

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

एनसीसी कॅम्प २३ जून ते तीन जुलै या कालावधीत आर्टिलरी सेंटर या ठिकाणी श्री भटू पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली गेलेल्या कॅम्पला विद्यार्थ्यांनी यश मिळवले रनिंग सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांचे संचलन व इतर सर्व कार्यक्रमांबरोबरच ह्या वेळेस सर्व विद्यार्थ्यांना फायरिंग करण्यास व स्वतः विमान बोर्ड बनवून त्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी इतर विद्यार्थ्यांना दाखवले त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावत नव्हता आज सर्व





विद्यार्थ्यांचे माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत्यवतीने गुणगौरव व सर्टिफिकेट व मेडल देऊन सर्वांच्या वतीने सत्कार करण्यात आला विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र व पदक देऊन गौरवण्यात आले अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक भालेराव सर सूत्रसंचालन केशव जगताप सर तुपे सर भटू पाटील सर राठोड सर नीता पाटील मॅडम खैरनार मॅडम सुरेश सोनवणे सर हे सर्व उपस्थित होते

# गुरुपौर्णिमेनिमित्त शाळेत कार्यक्रम संपन्न

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

अंबिका मित्र मंडळ संचलि , माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत दौलतनगर, सिडको येथे गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुवंदना कार्यक्रम अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात पवित्र ओंकार आणि मंत्रोच्चाराने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान करून गुरुप्रती श्रद्धा व्यक्त केली. पारंपरिक पोशाखात साक्षात "*छोटे संत*" भासणाऱ्या विद्यार्थ्यांनी शाळेचे संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि स्नेहपूर्ण केले. विद्यार्थ्यांनी "*गुरु म्हणजे मार्गदर्शक, जीवनाचा दिपस्तंभ*" या विषयांवर सुंदर भाषणं सादर केली. तसेच श्लोक पठण, स्तुतीगीतं, गुरुमहिमा यावर छोट्या छोट्या नाटिका गायन व नृत्य सादर करून गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. बाळासाहेब पाटील, संस्थेचे सचिव श्री. अमोल बाळासाहेब पाटील, तसेच मुख्याध्यापक श्री. सतिश भालेराव यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात शाळेतील शिक्षकवृंद श्रीमती. निता पाटील, श्री. वसंत राठोड, श्री. भटू







पाटील, श्रीमती. वैशाली खैरनार, श्री. तुषार तुपे, श्री. सूरज सोनवणे, श्री. रमेश अंभोरे हे उपस्थित होते व कार्यक्रमात सक्रिय सहभागी झाले.

मुख्याध्यापक श्री.सतिश भालेराव यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना गुरुंच्या भूमिकेचे महत्त्व व शाळेतील संस्कारक्षम शिक्षणाचे मूल्य समजावून




सांगितले. श्री.सूरज सोनवणे सरांनी विद्यार्थांना आपले प्रथम गुरू हे आपले आईवडील आहेत आपण त्यांचा आदर करायला हवा, पुढे त्यांनी गुरुशिष्याचे महात्मे द्रोणाचार्य व एकलव्य यांच्या गोष्टीतून पटून दिले, संस्थापक अध्यक्ष श्री. बाळासाहेब पाटील यांनी शिक्षकवृंदाच्या कार्याची प्रशंसा करत गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने ज्ञानसंस्कृती जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. संस्थेचे सचिव श्री. अमोल पाटील यांनी गुरु-शिष्य परंपरेची आधुनिक काळातील गरज आणि शाळेतील एकात्मतेचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सुंदर आणि प्रभावी नियोजन शाळेतील सर्व शिक्षकांनी केले. विद्यार्थ्यांचा सहभाग व पालकांचा प्रतिसाद यामुळे कार्यक्रम अविस्मरणीय ठरला.

# कुराडी ग्रामपंचायत कार्यालय बेकायदेशीर बंद! 'ऑपरेटर' यांच्यावर सरपंचगिरीचे गंभीर आरोप

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------

आदर्श ग्रामपंचायत म्हणून नाव असलेल्या कुराडी ग्रामपंचायतीवर सध्या मनमानी आणि अनधिकृत कारभाराचे गंभीर आरोप होत असून, यामध्ये ग्रामपंचायतचे ऑपरेटर छगन दुर्गाप्रसाद अग्रेल यांनी स्वतःला सरपंच समजून वागल्याचा आणि कार्यालय बेकायदेशीररित्या बंद ठेवल्याचा ठपका ग्रामस्थ आणि सदस्यांनी ठेवला आहे.

९ जुलै २०२५ रोजी संपूर्ण दिवसभर (सकाळी १०.३० ते सायं. ५.३०) ग्रामपंचायत कार्यालय बंद होते. यामुळे ग्रामस्थांच्या विविध शासकीय कामांना अडथळा निर्माण झाला. ग्रामपंचायत सदस्य राजकुमार प्रीतीलाल गौतम यांनी यासंदर्भात थेट आरोप करत सांगितले की, "ऑपरेटर छगन अग्रेल यांनी कार्यालय बंद ठेवून अधिकारांचा सरळसरळ गैरवापर केला असून हे शासकीय सेवेस बाधक आहे."

या प्रकरणात अधिक खळबळजनक बाब म्हणजे छगन अग्रेल यांना स्पष्टीकरण मागितले असता त्यांनी उद्धटपणे "तुला जे करायचं आहे ते कर. मी






संघटनेचा पदाधिकारी आहे. ज्याला बोलवायचं आहे तो बघून घेईल," असे उत्तर दिले, अशी माहिती समोर आली आहे. या अरेरावीमुळे नागरिक आणि ग्रामपंचायत सदस्य संतप्त झाले असून त्यांनी या वर्तनाचा तीव्र निषेध केला आहे.

कार्यालय बंद असताना इतर कर्मचारी कुठे होते, याबाबतही अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. परिचर मोहन मरसकोल्हे हे वैध रजेवर असल्याचे स्पष्ट झाले, योजना दूत मनीषा लांजेवार या सर्वेक्षणात व्यस्त होत्या, तर रेखाताई लांजेवार कोणतीही अधिकृत रजा न घेता अनुपस्थित होत्या. तरीही कार्यालय बंद का ठेवण्यात आले? याचे उत्तर प्रशासनाकडे नाही.

या मनमानीने अनेक सामान्य नागरिकांचे काम प्रलंबित राहिले. शिवराज लांजेवार यांचा विवाह नोंदणीसाठीचा अर्ज कार्यालय बंदमुळे मंजूर होऊ शकला नाही. "ग्रामपंचायत कार्यालय हे जनतेसाठी आहे. मग एखाद्या व्यक्तीच्या मनमानीने ते बंद ठेवण्याचा अधिकार त्याला कोणी दिला?" असा सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.

या प्रकरणी ग्रामपंचायत सदस्य राजकुमार गौतम यांनी इशारा दिला आहे की, जर यावर तात्काळ कारवाई झाली नाही, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करून चौकशी व निलंबनाची मागणी करण्यात येईल.

सरपंच अनिल मळावी यांनी यासंदर्भात मौन सोडत म्हटले, "ही गंभीर बाब आहे. याबाबत योग्य ती चौकशी करून लवकरच कार्यवाही केली जाईल." दरम्यान, ग्रामविकास अधिकारी शिवानंद गौतम यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचा काहीही प्रतिसाद मिळाला नाही.

संपूर्ण घटनेवरून स्पष्ट होते की, कार्यालय बेकायदेशीरपणे बंद ठेवण्यामागे छगन अग्रेल यांचा मनमानी कारभार कारणीभूत आहे. प्रशासनाकडून या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असून जबाबदारीची टाळाटाळ केली जात आहे. यामुळे नागरिकांचे हक्क डावलले गेले असून त्यांना मूलभूत सेवा नाकारल्या गेल्या आहेत. त्यामुळे तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे ही वेळेची गरज ठरत आहे.

# अनधिकृत चर्च पाडली जातील — महसूल मंत्री बावनकुळे यांची मोठी घोषणा "विदेशी निधीतून चर्च बांधणी; आदिवासींचे प्रलोभन देऊन धर्मांतर सुरू"

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

नवापूर (नंदुरबार) तालुक्यात तब्बल १९९ अनधिकृत चर्च उभारण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाल्यानंतर, राज्य विधिमंडळात या मुद्द्यावर खळबळ उडाली आहे. या चर्चांच्या उभारणीमागे बेकायदेशीर निधी आणि संगनमताने धर्मांतर घडवून आणण्याचा प्रकार सुरू असल्याचे आरोप करण्यात आले.

धुळेचे आमदार अनुप अग्रवाल यांनी हा मुद्दा अधिवेशनात मांडत आदिवासी भागांतील बेकायदेशीर धर्मांतराची माहिती दिली. यावर उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठी घोषणा करत सांगितले की, "राज्यातील सर्व अनधिकृत



चर्च पाडली जातील."

मंत्र्यांनी स्पष्ट केले की, आदिवासी भागांतील मूळ रहिवाशांना विविध प्रलोभने देऊन त्यांचे बुद्धिभेद करून धर्मांतर केले जात आहे. अनेक वेळा हे धर्मांतर करणारे अनुसूचित जाती-जमातींचे खोटे प्रमाणपत्र दाखवून शासनाच्या योजनांचा गैरफायदा घेत असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे अशा प्रकारांवर कठोर कारवाई कधी केली जाईल? आणि धर्मांतरबंदी कायदा कधी लागू होणार, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, "मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून लवकरच कायदा तयार केला जाईल."

दरम्यान, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी देखील विधानसभेत माहिती देताना सांगितले की, "बेकायदा चर्च उभारणीसाठी विदेशातून मोठ्या प्रमाणात पैसा येतो आहे. गेल्या वर्षी तब्बल १५१५ संस्था परदेशी निधीच्या आधारे कार्यरत होत्या."

या सर्व पार्श्वभूमीवर, राज्यात बेकायदा धर्मांतराचे जाळे मोडून काढण्यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करण्याची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे.

# "आमच्या जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्राचा प्रश्न तात्काळ सोडवा!" — गीता कोळी यांचे आदिवासी मंत्र्यांना निवेदन

संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------

धुळे जिल्ह्यातील टोकरे महादेव मल्हार कोळी समाजासह महाराष्ट्रातील अन्य ३३ अनुसूचित जमातींच्या जात वैधता प्रमाणपत्र विषयक गंभीर प्रश्नांबाबत आदिवासी विकास मंत्री मा. श्री. अशोक उईके यांना गीता कोळी यांनी जमात बांधवांच्या वतीने निवेदन दिले.

या निवेदनात "आमच्या जमातीचा जात वैधता प्रमाणपत्राचा प्रश्न लवकरात लवकर सोडवावा", तसेच "अनुसूचित जमाती



आयोगामध्ये आमच्या समाजाचे प्रतिनिधित्व असावे" अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागांमध्ये मध्यप्रदेश व गुजरात राज्यातून स्थलांतरित होऊन महाराष्ट्रात आलेल्या, धर्मांतरित व बिगर महाराष्ट्रीयन आदिवासींच्या जात प्रमाणपत्रांची सखोल चौकशी व्हावी, अशा प्रकारे १९५० पूर्वीचे नोंदी इतर राज्यातील आढळल्यास त्यांची जात प्रमाणपत्रे जप्त करावीत, अशी ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

मा. मंत्री श्री. अशोक उईके यांनी या निवेदनावर सकारात्मक प्रतिसाद दिला असून, प्रश्न सोडविण्यासाठी योग्य त्या पावलं उचलण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# भेट रांगेतली....

मागील महिन्यामध्ये म्हणजेच २५ मे ला मला महाराष्ट्र रत्न समाज भूषण पुरस्कार २०२५ हा मिळाला हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी आम्ही सोलापूरला गेलो होतो. पुरस्कार सोहळा अगदी आनंदात आणि दिमाखात संपन्न झाला. सोलापूरला आलोच आहे तर भेटूरायाचे दर्शन घेऊया असं म्हणून पंढरी म्हणजेच पंढरपूरला दर्शनासाठी गेलो. पंढरपूरला आल्यानंतर एक सुंदर असा अनुभव मिळाला. रविवारचा दिवस असल्यामुळे पंढरपूरच्या मंदिरात खूप प्रचंड अशी गर्दी होती. दर्शनासाठी लांबच लांब अशी रांग लागली होती. आम्ही दर्शनासाठी रांगेत उभे राहिलो. दर्शनासाठी रांगेत उभे असतानाच, मला माझ्यापुढे तमिलनाडु वरून काही भाविक आले होते ते भेटली, ते महाराष्ट्रातील देवदर्शन यात्रेसाठी आले होते. आमच्यातील एका जणांनी त्यांना थोडे पुढे सरकता का? असे म्हटले त्यावर त्यांनी काहीच प्रतिक्रिया दिली नाही. त्यानंतर थोडे बाजू मे हट सकते हो क्या? यावरही काहीच प्रतिक्रिया नाही..!

यावर मला असे समजले की यांना मराठी येत नाही. मग मी त्यांना इंग्लिश मध्ये बोललो, can you please be a side little.. त्यावर त्यांची प्रतिक्रिया Yes of course आणि तिथून आमचा इंग्लिश मधून संवाद चालू झाला. त्यांना खऱ्या अर्थाने कोणी इंग्लिश मध्ये काही करणार भेटलं नव्हतं. त्यांना याचा आनंद झाला की, या मोठ्या रांगेमध्ये आपली भावना समजून घेईन असं कोणीतरी भेटलं याचा आनंद झाला. यावर त्यांनी विचारलं की पांडुरंग, पंढरपूर ह्या मी अनेक वेळा ऐकलं आहे पण पहिल्यांदाच आलो. जून जुलै च्या दरम्यान मध्ये वारी निघत असते ही ऐकून आहोत. पण आम्हाला याबद्दल जास्त माहिती देऊ शकता का? हो म्हणून मी त्यांना पंढरी पांडुरंग आणि आषाढी वारी यावर खूप सारी माहिती दिली. अगदी त्या रांगेत विठ्ठलाच्या दर्शनापर्यंत आमचा तो संवाद चालू होता. दर्शन झाल्यानंतर त्यांना मी आवर्जून विचारले कसे वाटले मग विठ्ठलाचे दर्शन घेऊन? त्यांनी सांगितले जेव्हा अगदी काहीच क्षणासाठी आम्ही आमचे डोकं विठ्ठलाच्या चरणी ठेवले तेव्हा मन अगदी प्रसन्न आणि शब्दात न सांगता येणारी भावना मनात तयार झाली. आम्ही अनेक देवदर्शन केले पण त्यातील हे पहिलंच असं देवस्थान आहे जिथं त्याच्या पायावरती डोक्यात ठेवता आलं. खरंच ना त्यामुळेच ओढ लागते ती पंढरीची आणि विठुरायाची.. भाषेतून आणि भावनेतून आम्हाला पंढरी कळली.. असे काही इंग्लिश मध्ये बोलून.. आमचा संवाद संपला.

खऱ्या अर्थाने त्या व्यक्तींना भेटून मनालाही अतिशय आनंद झाला. त्यांच्यासोबत झालेल्या संवाद अगदी अविस्मरणी आहे. त्यांनी असेही सांगितले की आमच्या इथे इंग्लिश आणि तमिल अशा दोन भाषेवर जास्त भर आहे. हिंदी जरी राष्ट्रभाषा आहे तरीसुद्धा आमच्या राज्यामध्ये तिचा एवढा प्रसार आणि प्रचार नाही. त्या संवादाच्या दरम्यान त्यांची संस्कृती आणि आपली संस्कृती विचार यावर खूप वेळ चर्चा केली. त्यांनी मंदिरामध्ये असणाऱ्या प्रत्येक वास्तू आणि वस्तूबद्दल विचारल्यानंतर सखोलपणे सांगण्याचा प्रयत्न केला.

त्यामुळेच म्हटलं जातं बोललं तर समजून घेता येतं..

----------------------------------------

लेखक
राहुल शिंदे, पुणे

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# डॉ. शालिनीताई बोरसे विद्यालयात गुरुपौर्णिमा / व्यासपौर्णिमा उत्साहात संपन्न

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

अंबिका मित्र मंडळ संचलित डॉ. शालिनीताई बोरसे माध्यमिक विद्यालयात दिनांक १०/०७/२०२५ वार : गुरुवार रोजी विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. गुरुपौर्णिमा असल्यामुळे सुरुवातीला पसायदान म्हणून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

"गुरु परमात्मा परेशु||"

या गीताने वातावरण गुरुमय झाले, विद्येची देवता सरस्वती मातेच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आपल्या गुरूंच्या प्रती आदर व्यक्त करण्यासाठी विद्यालयातील गीतमंचातील विद्यार्थिनींनी "गुरुने दिला ज्ञानरूपी वसा| आम्ही चालवू हा पुढे वारसा|

हे गुरुभक्तीपर गीत सादर केले. विद्यालयात विद्यार्थ्यांनी व्यास ऋषीमुनींची वेशभूषा



करून व्यास ऋषींची माहिती संगितली. विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा व व्यास पौर्णिमा यावर भाषण करून गुरुपौणिमेचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. बाळासाहेब पाटील, सचिव संदिप पाटील संस्थेचे प्रशासन अधिकारी श्री.राजेंद्र सोनवणे, शाळेच्या मुख्याध्यापिका कविता देवकर मॅडम व सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद उपस्थित होते . माननीय देवकर मॅडम यांनी गुरु शिष्य यांच्या जीवनावर आधारित कथा सांगून गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन समीक्षा हरळे व सायली लाड या विद्यार्थिनींनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माननीय कुमुद मोरे सर, लकेश देसले सर, मनीषा पाटील मॅडम, प्रतिभा दिवे मॅडम, ज्योती गुजर मॅडम ,चांदणी पगारे मॅडम, मनाली लोखंडे मॅडम, सुनील पाटील, भाऊसाहेब भामरे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# अंबिका मित्र मंडळ संचलित, स्व. मुकेशभाई पटेल प्राथमिक विद्यालय, दत्तनगर चुंचाळे येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------

अंबिका मित्र मंडळ संचलित स्व. मुकेशभाई पटेल प्राथमिक विद्यालय, दत्तनगर चुंचाळे येथे दिनांक २१ जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संत-महंत, साधू-संत व महापुरुष यांची वेशभूषा साकारून गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच काही विद्यार्थ्यांनी 'गुरु म्हणजे काय?', 'गुरूचे महत्त्व' यासारख्या विषयांवर मनोगते व भाषणे सादर केली. यामुळे संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय व प्रेरणादायी वातावरणाने भारले होते.

या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री. सागर पाटील, संस्थापक अध्यक्ष श्री. बाळासाहेब पाटील आणि संस्था सचिव श्री. अमोल बाळासाहेब पाटील हे विशेष उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना गुरूंच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शन करत, गुरुपौर्णिमेचे महत्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षकवृंद – श्रीमती कविता पाटील, श्रीमती वैशाली भदाणे, श्रीमती रंजना मांडवडे, श्री. सतीश अहिरे, श्री. जयेश सोनवणे, श्री. विक्रांत नेरकर, श्री. गोवर्धन अहिरे, श्रीमती कल्पना पवार, सौ. मनीषा भामरे आणि सौ. शितल पगार – यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनीच केले तर शेवटी आभारप्रदर्शन करण्यात आले. गुरुपौर्णिमेचा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय आणि संस्कारपर ठरला.

# सटाणा महामार्गाचे निकृष्ट दर्जाचे काम; ठेकेदारावर कारवाईची मागणी
## पिंपळनेर ग्रामस्थ व शिवसेना (ठाकरे गट) कडून प्रशासनाला निवेदन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

पिंपळनेर शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ जी या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याची गंभीर तक्रार शिवसेना (ठाकरे गट) व स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. यासंदर्भात प्रशासनाला दिलेल्या निवेदनाद्वारे सदर कामाची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत (ब्लॅक लिस्ट) टाकण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.

या रस्त्याचे काम मागील सहा वर्षांपासून रखडले होते. स्थानिक नागरिकांनी वारंवार आंदोलने, दोन वेळा आमरण उपोषण करून सतत पाठपुरावा केल्यानंतर हे काम मंजूर करण्यात आले. मात्र, ज्या एजन्सीला हे काम देण्यात आले, त्यांनी व संबंधित



अधिकाऱ्यांनी कथितपणे भ्रष्टाचार करत अत्यंत खराब दर्जाचे काम केले. शासनाच्या परिपत्रकानुसार आवश्यक निकष पाळले गेले नसून, केलेले काम एक महिनाही टिकू शकले नाही, ही बाब कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

निवेदनात मागणी करण्यात आली की, रस्त्याच्या कामाची वरिष्ठ पातळीवर चौकशी व्हावी.

संबंधित ठेकेदाराला शासनाच्या ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात यावे.सदर काम तत्काळ त्या ठेकेदाराकडून काढून घेऊन दुसऱ्या सक्षम ठेकेदाराकडे देण्यात यावे. कामावर देखरेख करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे. या मागण्यांची दखल न घेतल्यास, पिंपळनेर ग्रामस्थ व शिवसेना (ठाकरे गट) तर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

निवेदन देताना शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख किशोर आप्पा वाघ, उपजिल्हा संघटक अलका जाधव, शहरप्रमुख महेश वाघ, चिंतामण ठाकरे, मयूर नांद्रे, अर्चना चव्हाण, कांदा उत्पादक संघटनेचे जिल्हा युवा अध्यक्ष गंगाधर शिंदे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू इंग्लिश स्कूल नांदगाव गुरुपौर्णिमा म्हणजे महर्षी व्यास यांची जयंती (व्यास पौर्णिमा)साजरी करण्यात आली.

मंचावर मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मुख्याध्यापिका काळे मॅडम, पर्यवेक्षक अविनाश शेवाळे यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. सर्व मान्यवरांचे प्रतिक म्हणून मुख्याध्यापिका श्रीमती काळे मॅडम यांचे इयत्ता दहावीचे विद्यार्थी ममता जैन हिने पाद्यपुजन केले .

त्यानंतर मंचावर उपस्थित




असलेल्या सर्व शिक्षक , शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचा पुष्प व पेन देऊन विद्यार्थ्यांनी सन्मान केला. गुरुपौर्णिमा निमित्ताने विद्यालयातील आरुषी बोरसे, गौरी सोनवणे, वेदश्री महाजन, स्वरा गायकवाड, कस्तुरी कुलकर्णी या विद्यार्थिनींनी गुरुप्रती आपला आदरभाव व्यक्त केले.

खालकर सर यांनी आषाढ महिन्यातील पहिली पौर्णिमा म्हणजेच महर्षी व्यास जयंती व गुरुपौर्णिमा (व्यास पौर्णिमा) असते.तसेच महाभारत हे महाकाव्य महर्षी व्यास रचित आहे हे सांगितले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये श्रीमती काळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जीवनामध्ये गुरूचे स्थान किती महत्त्वाचे आहे समजावून सांगितले. तसेच गुरु शिष्य नाते कसे असावे हे उदाहरणातून स्पष्ट केले.

मविप्र संस्थेचे तालुका संचालक आदरणीय श्री आमित भाऊ बोरसे पाटील यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी ममता जैन व वेदिका जाधव यांनी कले .

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी दूध व्यवसाय महत्त्वाचा : ॲड निलेश हेलोंडे
## उमरी तालुक्यात जिरोना येथे गायरान जमिनीत चारा लागवड प्रकल्प उद्घाटन संपन्न

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी दूध व्यवसाय हा महत्त्वाचा असून यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र राज्य ही संस्था कार्यरत आहे. प्रत्येक गावात उपलब्ध असलेल्या गायरान जमिनीत सुपर नेपियर सारखा चारा उगवून तो गावातील पशुधनास मोफत मिळाला तर अल्पभूधारक शेतकऱ्यांसह भूमिहीन मजूरसुद्धा मोठ्या प्रमाणात दूध व्यवसाय करू शकतील, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत उमरी



तालुक्यातील जिरोना येथे असणाऱ्या गायरान जमिनीत चारा लागवड प्रकल्पाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

सततचा येणारा दुष्काळ व चाराटंचाईमुळे विदर्भ, मराठवाड्यात दूध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर होत नाही. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी दूध व्यवसाय हा महत्त्वाचा असल्याचे अनेक अभ्यासात दिसून आले आहे. शेतकऱ्यांना पिकाचा पैसा हातात येण्यासाठी किमान १२० दिवस लागतात तर दुधाचा पैसा दर दहा दिवसाला आपल्या खात्यामध्ये येऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी हा प्रकल्प आपला स्वतःचा समजून या प्रकल्पात योगदान द्यावे व आपल्या पशुधनासाठीचा आवश्यक चारा आपल्या गावातील गायरानातच उगवावा व दूध व्यवसायातून आर्थिक दृष्ट्या समृद्ध व्हावे, असे आवाहन ॲड निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

याच पद्धतीने गायरान जमिनीमध्ये चारा लागवड करण्यासाठी नांदेड जिल्ह्यामध्ये १०० एकरचे उद्दिष्ट ठेवल्याचे मनरेगाचे उपजिल्हाधिकारी संजीव मोरे यांनी सांगितले.

यावेळी वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे के. डी. देठे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी संजीव मोरे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रवीण कुमार घुले, डॉ. रोहित धुमाळ, प्रशांत थोरात, तहसीलदार उमरी, डॉ. श्रीनिवास जिंकलोड पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती उमरी, वनविभागाचे दिनकर पाटील तसेच कृषी विभागाचे अधिकारी, जिरोना ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व नागरिक उपस्थित होते.

# कामगार कुटूंबियांनी शिक्षण आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी
## जिल्हा प्रशासनाचा कामगारांसाठी नाविण्यपूर्ण उपक्रम
## वाजेगाव येथे कामगारांसाठी नोंदणी व आरोग्य शिबिर संपन्न.

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

कामगारांच्या कुटूंबियांनी शासनाच्या #शिक्षण आणि #आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. आज जिल्हा प्रशासनाच्यावतीने नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत कामगार बांधवांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच असंघटीत क्षेत्रातील कामगारांना शासनाच्या विविध योजना लाभ देण्यासाठी कामगारांची नोंदणी व आरोग्य शिबिर कार्यक्रमाचे आयोजन वाजेगाव नोबल फंक्शन हॉल येथे केले होते. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, कामगार कल्याण सहाय्यक आयुक्त अनिकेत थोरात, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसिलदार संजय वारकड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण मुंडे, नायब तहसिलदार सुनिल माचेवाड, संजय नागमवाड, वाजेगावचे सरपंच जमील सेठ आदीची उपस्थिती होती.

वंचित, उपेक्षित घटकांना शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचाव्यात, त्यांना




त्या योजनांचा लाभ प्रत्यक्ष मिळावा यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच उपक्रमाच्या माध्यमातून आज कामगारांच्या नोंदणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा जिल्हा प्रशासनाचा स्तुत्य उपक्रम असून या शिबिराच्या माध्यमातून महिला, असंघटीत कामगार यांना आरोग्य, शिक्षणासह इतर विविध सुविधांचा लाभ एकाच ठिकाणी देण्यात येत आहे. या शिबिराचा त्यांनी लाभ घ्यावा, असेही आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी केले.

या शिबिरात कामगारांचा नोंदणी स्टॉल, आयुष्यमान कार्ड स्टॉल, आरोग्य शिबिर स्टॉल असे विविध योजनांचे स्टॉल लावण्यात आले होते. या शिबिरात महिलांची संख्या मोठया प्रमाणात होती. तसेच सीएससी सेंटर चालकांनी या शिबिरात नोंदणी करण्यासाठी मोठया प्रमाणात योगदान दिले आहे.

या शिबिरात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी आरोग्य विषयक माहिती देवून महिलांनी आपली तपासणी करुन घ्यावी असे सांगितले. तसेच त्यांनी महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. कामगारांना मिळणाऱ्या शासनाच्या विविध योजनेची माहिती देवून कामगार आयुक्त अनिकेत थोरात यांनी मार्गदर्शन केले.

या शिबिरात महिला व पुरुष असे एकूण ४९१ रुग्णांची तपासणी करण्यात आली. तर रक्त तपासणी १५६ रुग्णांची करण्यात येवून, १६ रुग्णांची इसीजी तपासणी करण्यात आली. १४५ लोकांना आयुष्यमान कार्ड वितरीत करण्यात आले तर २२५ कामगारांची ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्यात आली. या शिबिरात एकुण १ हजार ३३ लाभार्थ्यांना विविध लाभ देण्यात आले.

# गणू महाराज यांच्या पुढाकाराने साई चरणी दुग्धाभिषेक

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

गुरुपौर्णिमेनिमित्त म्हसदी येथील साई मंदिरात समाजसेवक गणू महाराज यांच्या वतीने भक्तिभावाने दुग्धाभिषेक करण्यात आला. प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही भक्तगणांच्या उपस्थितीत हा पावन विधी मोठ्या श्रद्धेने पार पडला.

गणू महाराज हे समाजातील गोरगरिबांच्या अडचणींना समजून घेणारे, संकटसमयी



धावून जाणारे आणि समाजकार्याचा ध्यास घेतलेले व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांनी अनेक गरजूंसाठी आपल्या कार्यातून दिशा दाखवली आहे. गुरुपौर्णिमा हे गुरुशक्तीचे प्रतीक असलेले पर्व साधून त्यांनी साई चरणी दुग्धाभिषेक करून भक्तांसोबत साधना आणि सेवा यांचा संगम घडविला.

या भक्तिमय सोहळ्याला गावातील साई भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. यामध्ये श्री. राजेंद्र देवरे, आबासाहेब देवरे, गोपाळ भामरे, मयूर कुलकर्णी, निलेश कुलकर्णी, ठाकूर सर, प्रकाश देवरे, रावसाहेब देवरे, अमोल देवरे, मंदिराच्या पुजारी सौ. मंगलाबाई गांगुर्डे, विजय अहिरे, अविनाश देवरे आणि युसुफ पिंजारी यांचा समावेश होता. कार्यक्रम शांत, भक्तिपूर्ण आणि साई चरणी एकरूप होणारा ठरला.

# गुरु शोधला जात नाही तो अनुभवातून उलगडत जातो; नरेंद्र बोरसे युवा उद्योजक नासा अँक्वा

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

पेडकाई माता सामाजिक शैक्षणिक संस्था साकोरा येथे आज गुरु पौर्णिमा निमित्त विद्यालयात गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ए. आर बोरसे यांनी प्रास्तविक केले . प्रमुख पाहूने विद्यालयाचे माजी विद्यार्थी नरेंद्र बोरसे युवा उद्योजक नासा अँक्वा व योगेश वाघ हे उपस्थित होते . प्रमुख पाहुण्याच्यां हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले . यावेळी मुख्याध्यापक योगेश




पाटील कार्यक्रमाचे अध्यक्ष होते .यावेळी नरेंद्र बोरसे यांनी गुरुपौर्णिमा निमित्त जिवनात गुरुजन यांचे महत्त्व विषद केले . गुरु अनुभवाने मिळतो उलगडतो कधी कधी पुस्तक , एखाद्या चुकीतून , एखादी ठोकर सुध्दा तुमचा गुरु ठरु शकते हे विषद केले .नरेंद्र बोरसे यांनी विद्यालयास स्पिकर सेट देण्याचे घोषित केले.अध्यक्ष भाषणात योगेश पाटील यांनी जीवनात नेहमी शिष्यत्वाची जाणीव होणे हाच खरा गुरु भेटण्याचा पहिला टप्पा असतो हे सांगितले . यावेळी यशश्री बोरसे , प्रमोद गावीत , स्नेहल अनिकेत , पार्थ , मानवी , गौरव , शर्वरी , समृद्धी या विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी आपल्या मनोगता मधून पुष्प गुंफले . कार्यक्रमा चे सुत्रसंचलन अनन्या बोरसे व आभार समृद्धी बोरसे व आभार अर्पिता हिने केले.